Vol 6 Issue 8 September 2016

ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

# Indian Streams Research Journal

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Dr. T. Manichander

Mr. Dikonda Govardhan Krushanahari
Professor and Researcher ,
Rayat shikshan sanstha's, Rajarshi Chhatrapati Shahu College, Kolhapur.

***International Advisory Board***

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

***Editorial Board***

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.org**

ISSN: 2230-7850 Impact Factor :4.1625(UIF) Volume - 6 | Issue - 8 | September - 2016

Indian Streams Research Journal

# संगीत क्षेत्रातील दोन समकालीन स्त्रियांचे सांगीतिक कार्य

सौ. निलम मुकुंद बोकील , डॉ. स्नेहाशिश दास

**सारांश**

भारतीय संगीताचा प्रवास प्रामुख्याने चार टप्प्यामध्ये झाला. वैदिक काळापासून संगीतकला अस्तित्वात होती. पुढे मुसलमानी अमदानीत मात्र संगीत कलेचा ऱ्हास झाला. मुघलांच्या काळात संगीताला नवीन उर्जा मिळाली आणि संगीत कलेची भरभराट झाली. ब्रिटीशांच्या काळात मात्र परत एकदा संगीत कलेचा ऱ्हास झाला असे असले तरी छोट्या छोट्या संस्थानिकांनी संगीत कलेला आश्रय दिला व संगीत कला जिवंत ठेवली. अशा अतिशय प्रतिकूल परिस्थितीत देखील पंडित बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर, पं. विष्णु दिगंबर पलुस्कर, पं. भास्करबुवा बखले, खॉंसाहेब अब्दुल करीम खॉं, पं. रामकृष्णबुवा वझे, खॉंसाहेब अल्लादिया खॉं इत्यादी नामवंत कलाकारांनी संगीत कला सर्व सामान्यांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला.

हा आदर्श डोळयासमोर ठेवून मोगूबाई कुर्डीकर आणि हिराबाई बडोदेकर या समकालीन विदुषीनी माजघरापुरती मर्यादित असलेली संगीत कला अतिशय खडतर परिस्थितीतून संगीताचे शिक्षण घेवून सामान्य लोकांपर्यंत पोहोचवण्यात मोलाची भर घातली.

जयपूर घराण्याच्या ज्ञानवृध्द गायिका गानतपस्विनी मोगूबाई कुर्डीकरांनी तपश्चर्येतून संगीत कला आत्मसात केली, जोपासली, प्रदर्शित केली आणि ज्ञानदानाचे कार्य करून संगीत क्षेत्रात भरीव कामगिरी केली, तर गानहिरा हिराबाई बडोदेकरांनी आपल्या शालीन गायकीमधून कुलीन घरातील स्त्रियांना जलशामध्ये गाण्याची संधी उपलब्ध करून दिली. आपल्या वागणूकीमधून स्त्रियांचे घराणे जन्माला घालणाऱ्या हिराबाई किराणा घराण्यातील एक मौल्यवान रत्न होत्या.

घरगुती, सामाजिक, आर्थिक अशा सर्व अडचणींवर मात करून कला सिध्दी मिळविणाऱ्या गानतपस्विनी मोगूबाई कुर्डीकरांचे सांगीतिक योगदान महान होते. स्वातंत्र प्राप्तीनंतर समाजसुधारकांनी अतोनात प्रयत्न करून जसे स्त्रियांना




शाळा, महाविद्यालयापर्यंत पोहोचवले तसे पंडित विष्णु दिगंबर पलुस्करांच्या संगीत प्रचारा आधी व संगीत प्रचारानंतर काही स्त्रिया संगीत क्षेत्रात पदार्पण करू लागल्या होत्या. जसे हिराबाई पेडणेकर, अंजनीबाई मालपेकर, सुंदराबाई जाधव, मेनकाबाई शिरोडकर, केसरबाई केरकर, पद्मावती शाळीग्राम, गंगुबाई हनगल, जोत्स्ना भोळे, ताराबाई शिरोडकर, इत्यादी. परंतु प्रत्यक्ष संगीताच्या स्वरमंचावर, रंगभूमीवर मात्र एकाही स्त्रीने पर्दापण केले नव्हते. अशा काळात वाहत्या प्रवाहाच्या विरूध्द दिशेने हात मारून प्रवाह वळवण्याचे धाडस 1921 मध्ये एका स्त्रीने केले आणि ती असामान्य स्त्री म्हणजे 'गानहिरा हिराबाई बडोदेकर' होत्या.

या त्यांच्या असामान्य कार्याची जाणीव करून देणे गरजेचे वाटते. आज घरोघरी स्त्रिया, मुली, अगदी सहजपणे मुक्त मनाने संगीताचे शिक्षण घेत आहेत. मंचावर बसून निर्धास्तपणे आपली कला प्रदर्शित करत आहे. संगीत रंगभूमीवर मोकळेपणाने वावरतांना दिसत आहेत ते केवळ ह्या योगिनींच्या महान सांगीतिक योगदानामुळेच.

## प्रस्तावना

विसाव्या शतकामध्ये जन्माला आलेल्या मोगूबाई कुर्डीकर आणि हिराबाई बडोदेकर या समकालीन विदुषींच्या कार्यावर प्रकाश टाकतांना असे दिसून येते की, त्या काळामधील सामाजिक परिस्थिती आजच्या अत्याधुनिक काळासारखी स्त्रियांना सहज स्वतंत्रपणे वावरण्याची मुभा असलेली नव्हती. त्याकाळामध्ये स्त्रियांना सामाजिक प्रतिष्ठा लाभलेली नव्हती. सर्वसामान्य स्त्रियांचे वास्तव्य घराच्या चार भिंतींच्या आतच होते. स्त्रियांनी जाहिरपणे गाणे म्हणणे हाच मुळात हीन चारित्र्याच्या स्त्रियांचा व्यवसाय समजला जात होता. स्त्रिया केवळ राजे, सामंत यांचे मनोरंजन करण्यासाठी संगीतातील 'ठुमरी' गीत प्रकार अदाकारी करून गात असत. अशा कठीण काळामध्ये मोगूबाई कुर्डीकर व हिराबाई बडोदेकर या दोघींनी संगीत क्षेत्रात पर्दापण केले होते आणि ज्या काळामध्ये संगीत कलेला उच्च प्रतिष्ठा प्राप्त झाली होती, संगीत कलेला राजमान्यता मिळालेली होती, त्या काळात मोगूबाई आणि हिराबाई या दोघींनी शासकीय व सामाजिक सर्व प्रकारचे अत्युच्च मानसन्मान प्राप्त करून संगीत क्षेत्रातून निवृत्ती स्विकारली होती. अदाकारी संगीताला प्रतिष्ठेच्या सिंहासनावर बसवण्यामध्ये या दोघींचा मोलाचा वाटा आहे. त्या दोघींची संगीत कला जितकी थोर, श्रेष्ठ होती तितकेच त्यांचे सांगीतिक कार्य देखील आदर्शवादी होते.

त्या दोघींनी अपार कष्ट करून प्रचंड चिकाटीने संगीत क्षेत्रात असामान्य कर्तृत्व गाजवले. दोघींमध्ये प्रचंड बुध्दिमत्ता, नितांत समंजसपणा, शालीनता आणि बाणेदारपणा हे गुण असल्यामुळे दोघींनी देखील संगीत क्षेत्रात आपापला एक वेगळाच ठसा

उमटवला. सांगीतिक कार्य करतांना देखील दोघींना असंख्य अडचणी आल्या, अनेक संकटे आली, पण दोघींनी खंबीरपणे, न डगमगता मोठया हिमतीने स्वतःची वाट स्वतःच शोधली. आणि संगीत क्षेत्रात आपले नाव अजरामर केले. त्या दोघी संगीताच्या वाटेवर धैर्याने, श्रध्देने चालल्या होत्या म्हणून श्रोत्यांनी देखील त्यांचे संगीतावरचे असलेले प्रभुत्व आणि सांगीतिक कार्य स्विकारले व त्यांना यशाच्या शिखरावर नेवून बसविले.

कलाकार आपल्या कल्पना विलासातून स्वराच्या माध्यमाचा उपयोग करून एक स्वतंत्र विश्व निर्माण करत असतो. स्वर आणि कल्पनाशक्तीचा समर्थपणे उपयोग करून निर्माण होणाऱ्या वेगळयाच विश्वात कलाकार स्वतःबरोबर श्रोत्यांना सामावून घेत असतो. अशी क्षमता प्राप्त करून घेण्यासाठी पूर्वीच्या काळी कलाकाराला मोठया दिव्यामधून, कठोर परिश्रमातून आणि विविध कसोटयांमधून तावून सुलाखून निघावे लागत असे. त्यानंतरच कलेची निर्मिती करण्याची क्षमता तो कमवत असे. कल्पनाविष्काराच्या जोडीने कलाकार भावनिक आव्हाने देत शास्त्रीय संगीताचा मनोरा उभा करत असे.

ईश्वरदत्त नैसर्गिक गुणविशेषांमुळे निश्चितच मोगूबाई कुर्डीकर व हिराबाई बडोदेकर या स्त्री कलावंताच्या अविष्कारात वेगळेपण असल्याचे त्यांच्या चरित्र अभ्यासावरून आपल्याला दिसून येते. ते वेगळेपण दाखवण्याचा प्रयत्न या शोध निबंधाद्वारे केला जात आहे.

अभिजात संगीताची अभिरूची बहुजन समाजात अपरंपार वाढत आहे. संगीत कलेच्या उर्जितावस्थेसाठी झटणाऱ्यांच्या पाठीशी भारतीय शासनसंस्था आज उभी आहे. अशा वेळी संगीताची उपासना करू इच्छिणाऱ्या नव्या पिढीला आवड असलेल्या बहुजनसमाजाला संगीतातील या महान साधिकांनी केलेल्या आटोकाट परिश्रमांची व हठयोगी साधनेची जाणीव असावी आणि आपण त्यांच्यासारखे घडण्याचा प्रयत्न करू अशी स्फूर्ती भावी पिढीला मिळावी या हेतून हया दोघींच्या कार्याची माहिती देण्याचा प्रयत्न केला जात आहे.

### *मोगूबाईंची सांगीतिक वाटचाल*

''मोगूबाई कुर्डीकरांचा'' जन्म 15 जुलै 1904 रोजी गोव्यामधील 'कुर्डी' हया छोटयाशा गावात झाला. त्यांच्या गळयामधील उपजत स्वर त्यांची आई जयश्रीबाईंना उमगला होता. त्यामुळे त्या मोगूबाईंना घेवून कुर्डीपासून जवळ असलेल्या 'जांबवली' गावातील हरिदासाकडे गेल्या. मोगूबाईंनी संगीतातील पहिली मुळाक्षरे 1912 मध्ये म्हणजे वयाच्या सातव्या वर्षी गिरवण्यास सुरूवात केली. अशा प्रकारे मोगूबाईंच्या संगीत शिक्षणास सुरूवात झाली. हरिदासाचा मुक्काम हलताच मोगूबाईंचे संगीत शिक्षण थांबले. त्याकाळात संगीत शिक्षणाचा दुसरा मार्ग म्हणजे संगीत नाटक कंपनी हा होता. मोगूबाईंना त्यांची आई 1913 मध्ये म्हणजेच मोगूबाईंच्या वयाच्या नवव्या वर्षी चंद्रशेखर भूतनाथ संगीत मंडळीत घेवून गेली. तिथे मोगूबाईंना नाटक मंडळीतील गवयांकडून संगीताचे शिक्षण मिळाले आणि त्यांच्या वयाला साजेशा ध्रुव, प्रल्हाद अशा भूमिका देखील मिळाल्या. त्या भूमिका साकार करण्यासाठी काही पदे, भक्तिगिते गाण्याची संधी सुध्दा त्या नाटक मंडळीत मोगूबाईंना मिळाली. पण तिथेदेखील त्यांच्या संगीत शिक्षणात विघ्न आले. नाटक कंपनीच बंद पडली. पर्यायाने मोगूबाईचे संगीत शिक्षण थांबले त्याच सुमारास 1914 मध्ये मोगूबाईंच्या आईंचे निधन झाले.

### *आईंची इच्छा पूर्ण करण्याची तळमळ :*

आईंच्या मनामध्ये असलेली मुलीला नामवंत गायिका करण्याची शेवटची इच्छा पूर्ण करण्यासाठी मोगूबाईंनी आपले संपूर्ण जीवन संगीत कलेसाठी समर्पित करण्याचा निर्धार केला. मोगूबाईं आपल्या मनातील अभिजात संगीताचा शोध घेण्यासाठी कुर्डी गावाच्या बाहेर पडल्या. 1917 मध्ये मोगूबाईं सातारकर स्त्री नाटक कंपनीमध्ये दाखल झाल्या तिथे त्यांनी चिंतोबा गुरवांकडून नाटय संगीताचे शिक्षण घेतले तर रामलाल, चुनिलाल व मंजेलखॉं यांच्याकडून कथ्थक नृत्याचे शिक्षण घेतले. दत्तोरामजी नांदोरकरांच्या कडून मोगूबाईंनी गझल, ठुमरी, दादरा, कजरी, टप्पा, होरी इत्यादी संगीत प्रकार आत्मसात केले. पण महाराष्ट्रातील संस्थानांमधील महाराजांच्या रंजक मागणीमुळे मोगूबाईंनी सातारकर स्त्री मंडळाला रामराम ठोकला व त्या आपल्या कुर्डी गावी परत आल्या. ज्या संगीत कलेसाठी आपण आपले जीवन समर्पित करायला निघालो त्या संगीत कलेकडे सन्मानाने बघितले जात नसून एक मनोरंजनाचे साधन म्हणून बघितले जाते ह्या कल्पनेने त्या प्रचंड अस्वस्थ झाल्या आणि आजारी पडल्या.

### *संगीत शिक्षणासाठी गुरूंचा शोध*

1919 मध्ये हवापालट करण्यासाठी मोगूबाईं संगीताचा वारसा जपणाऱ्या सांगली गावात आल्या. तिथे त्यांनी इनायत खॉं पठाण यांच्याकडे एक वर्षे संगीताचे शिक्षण घेतले. सांगली मुक्कामात मोगूबाईं रियाज करत असतांना जयपूर गायकीचे संगीत सम्राट खॉंसाहेब अल्लादियाखॉं यांनी रस्त्यावरून जातांना मोगूबाईंचे स्वर ऐकले आणि ते मोगूबाईंच्या समोर जावून उभे राहिले. त्यांनी आपणहून मोगूबाईंना 1920 मध्ये शिष्य करून घेतले व त्यांना गाणे शिकविण्यास सुरूवात केली. मोगूबाईंचे हे शिक्षण दीड वर्षातच संपले कारण अल्लादियाखॉं सांगली सोडून मुंबईमध्ये स्थायिक झाले. मोगूबाईंच्या मनाने मात्र जयपूर गायकी आत्मसात करण्याचा ध्यास घेतला असल्याने मोगूबाईं देखील अल्लादियाखॉंची संगीताची तालीम घेण्यासाठी मुंबईमध्ये स्थायिक झाल्या. तिथे मोगूबाईंना शिकविण्यासाठी अल्लादियाखॉं वेळातवेळ काढून येत असत कारण मुंबईमध्ये सन 1921 मध्ये केसरबाई केरकरांनी अल्लादिया खॉं यांचा गंडा बांधला होता. अल्लादियाखॉंच्या कुटुंबाचे पालनपोषण केसरबाई करत असल्याने अल्लादिया खॉं यांनी बाहेर कुणालाच गाणे शिकवायचे नाही अशी त्यांना केसरबाईंची सक्त ताकीद होती. त्यामुळे मोगूबाईंच्या संगीत शिक्षणात वारंवार खंड पडू लागला व कालांतराने मोगूबाईंचे अल्लादिया खॉं यांच्याकडील शिक्षण बंद झाले.

मोगूबाईंच्या मनाने जयपूर घराण्याचे शिक्षण आत्मसात करण्याचाच ध्यास घेतला होता. पण शिक्षणात बरीच खंड पडू लागल्यामुळे 1924 मध्ये मोगूबाईंनी आग्रा घराण्याचे बशीर खॉं यांच्याकडून आग्रा घराण्याची तालीम घेण्यास सुरूवात केली. त्यानंतर 1926 मध्ये आग्रा घराण्याचे प्रमुख गायक उस्ताद विलायत हुसेन खॉं ह्यांच्या मोगूबाईं गंडाबंध शिष्य झाल्या. परंतु अल्लादिया खॉं यांना ही गोष्ट कळताच त्यांना अतिशय दुःख झाले. कारण मोगूबाईंच्या गळयावर अल्लादिया खॉं यांनी चढवलेली जयपूर गायकी पुसली जाऊ लागली होती. मोगूबाईं रेकून, आवाज खरडून गाऊ लागल्या होत्या. अल्लादियाखॉंना खूप वाईट वाटले होते. कारण त्यांनी मोगूबाईंना संगीत शिकवण्याचे वचन दिले होते, आणि त्यांच्याकडून त्या वचनाचा भंग झाल्यामुळे त्यांच्या मनाला फार खंत वाटत होती. म्हणून अल्लादिया खॉं यांनी त्यांचे बंधू हैदर खॉं यांना कोल्हापूर मधून 1926 साली मुंबईमध्ये बोलावले आणि मोगूबाईंची परत जयपूर घराण्याची रीतसर तालीम हैदरखॉं यांच्याकडे सुरू झाली. मोगूबाईंनी हैदर खॉं यांच्याकडे सहा वर्ष संगीताची तालीम घेतली आणि त्यानंतर 1934 सालापासून त्या पुनःश्च अल्लादिया खॉं यांच्या गंडाबंध शिष्या झाल्या.

अशाप्रकारे खंड पडत का होईना पण मोगूबाईंना सव्वीस वर्ष खॉसाहेब अल्लादिया खॉ यांच्याकडून जयपूर घराण्याची तालीम मिळाली होती.

### मोगूबाईंचा परिवार

मोगूबाईंचा विवाह सन 1923 मध्ये मुंबई मधील रईस श्रीयुत माधव भाटिया यांच्याशी झाला. मोगूबाईंना दोन कन्या व एक पुत्र. मोगूबाईंची मोठी कन्या गानसरस्वती किशोरी आमोणकर यांनी आईचा संगीताचा वारसा पुढे नेला. तर दुसरी मुलगी ललिता मराठी साहित्यामध्ये पारंगत आहे. धाकटा मुलगा उल्हास इंजिनिअर असून तो परदेशात असतो. मोगूबाईंची आई त्यांच्या वयाच्या दहाव्या वर्षीच गेली. मोगूबाईं अगदी एकट्या होत्या. त्यांना मायेचा आधार दिला तो त्यांच्या गौरी आजीने आणि रमा मावशीने. त्या दोघींच्या खंबीर पाठींब्यामुळेच मोगूबाईं संगीतात खडतर तपश्चर्या करू शकल्या.

### सांगीतिक कार्य

मोगूबाईंनी अभिजात संगीतावर प्रचंड निष्ठा ठेवली आणि तीच निष्ठा रसिक श्रोत्यांच्या मनात रूजवण्याचा त्यांनी मनापासून प्रयत्न केला. मोगूबाईंनी आपल्या जयपूर घराण्याची चौकट कधीच ओलांडली नाही. तर त्यांनी आपल्या घराण्याची अस्सल जयपूर गायकी श्रोत्यांच्या मनात रूजवली. त्यांनी आपल्या गाण्यात ख्याला व्यतिरिक्त ठुमरी, दादरा, टप्पा, होरी, भजन, नाट्यगीत इत्यादी कोणत्याही प्रकाराची सरमिसळ न करता केवळ ख्याल गायकीवरच प्रभुत्व संपादन केले आणि सुरेल, दमदार लयकारीचे शास्त्रशुध्द गाणे श्रोत्यांना ऐकावयास लावून ख्याल गायकीची अभिरूची श्रोत्यांच्या मनात निर्माण करण्याचा प्रयत्न केला. एका मागून एक चार ख्याल मैफलीत गाऊन व शास्त्रीय संगीतातील मर्म असलेल्या ख्यालाचे महत्व समाजाला पटवून देण्याचे महत्वाचे कार्य केले. आपल्या गान तपश्चर्येतून एका श्रेष्ठ गायन शैलीची उभारणी त्यांनी शास्त्रीय संगीतात केली होती. आपल्या घराण्याच्या संगीताचा वारसा पुढील पिढीने जपावा म्हणून ज्ञानदानाचे महत्वाचे कार्य मोगूबाईंनी उत्तम प्रकारे केले. मोगूबाईं उत्तम वाग्गेयकार होत्या. ख्यालानंतर त्याच रागातील द्रुत चीजा गाण्याची प्रथा मोगूबाईंच्या घराण्यात नव्हती. ती प्रथा मोगूबाईंनी खोडून काढून त्यांनी स्वतः अनेक रागात द्रुत चीजा रचल्या आणि संगीत साहित्यात मोठी भर घातली. त्यांनी स्वतः ख्यालानंतर आपल्या मैफिलीत त्या द्रुत चीजा गायल्याच पण आपल्या विद्यार्थ्यांना देखील ख्यालानंतर त्याच रागातील द्रुत चीजा म्हणावयाला शिकवले होते.

मोगूबाईंनी सावनीनट, जयतकल्याण, संपूर्ण मालकंस, भूपनट, शुध्द नट, बसंत–बहार, बसंती–केदार, नायकी कानडा, खोकर, सावनी कल्याण, बिहागडा अशा अनेक रागांमध्ये द्रुत चीजा बांधल्या. स्वराच्या ईश्वराला वंदन करावयाचे असेल तर स्वतःमधील अहंकाराला पहिल्यांदा बाजूला ठेवले पाहिजे हे त्यांनी समाजाला स्वतःच्या कृतीमध्ये दाखवून दिले. गुरूंवर श्रध्दा ठेवून मनापासून परिश्रम केल्यास विद्या निश्चितच साध्य करता येते हे देखील त्यांनी स्वानुभवावरून समाजापर्यंत पोहोचवले. अनेक अनवट रागांची ओळख मोगूबाईंनी स्वतःच्या गायकीतून सामान्य श्रोत्यांना करून दिली व ते राग श्रोत्यांच्या मनात रूजवण्याचे मोलाचे कार्य केले. एका खेडेगावात जन्माला आलेली, लहानपणीच अनाथ झालेली मुलगी, शास्त्रीय संगीताच्या ध्यासापोटी जीवनात आलेल्या असंख्य संकटांवर, अडचणींवर मात करून नामवंत गायिका होते, अनेक पुरस्काराने गौरविली जाते, ती केवळ स्वतःमध्ये असलेल्या आत्मविश्वासाच्या बळावर आणि अंतःकरणापासून असलेली स्वराची ओढ, स्वराचा ध्यास, ह्यामुळेच हे मोगूबाईंनी समाजातील स्त्रियांना दाखवून दिले. एखादी गोष्ट मनापासून साध्य करायची इच्छा असेल तर असलेल्या परिस्थितीला दोष देत न बसता, रडत न बसता तपश्चर्येतून तुम्ही ती कला, ती गोष्ट साध्य करू शकता ह्याचा पाठ खास करून मोगूबाईंनी स्त्रियांना दिला. स्वर साधनेतून, तपश्चर्येतून तुम्ही सिध्दी मिळवू शकता आणि संगीतात भरीव कामगिरी करू शकता, हयाची अनुभूती आपल्याला मोगूबाईंच्या गाण्यामधून अनुभवता येते आणि म्हणून मोगूबाईं तपस्विनी असल्याचे दिसून येते.

पद्मभूषण, संगीत नाटक ॲकॅडमी ॲवॉर्ड, द लास्ट टिटान, द ओनली व्हिजार्ड, गानतपस्विनी, संगीत संस्थांनी तसेच महाराष्ट्र शासनाने केलेला गौरव असे अनेक मान सन्मान मिळालेल्या मोगूबाईंनी यश अपयशावरून जीवनाची कृतार्थता मोजण्याचा मानदंड कधीच वापरला नव्हता, म्हणून त्या शांत होत्या आणि म्हणून त्यांच जीवनसंगीत हे कलेच्या मार्गावरून वाटचाल करणाऱ्यांसाठी स्वरोपनिषद आहे हे नक्की.

### मोगूबाईंचा शिष्य परिवार

जयपूर घराण्याला शाप होता की या घराण्यातील नामवंत व कर्तबगार गायक ऐन उमेदीमध्ये कालवश होत असत. (एखादा अपवाद वगळता) त्यामुळे शिष्य तयार करण्याची या घराण्याची क्रिया खंडीत झाली होती. दैवगतीने खंडीत झालेली ही परंपरा पुन्हा सुरू करण्याचे कार्य मोगूबाईंनी तीस वर्ष सातत्याने केले होते. त्यांच्या घरी सकाळी नऊ ते दुपारी बारा आणि संध्याकाळी पाच ते रात्री नऊ वाजेपर्यंत तंबोरा अखंड वाजत असे. कोणीना कोणी शिष्य मोगूबाईं जवळ बसून तालीम घेत असे. त्यांच्या शिष्यांमध्ये ख्यातनाम गायिका व त्यांची कन्या किशोरी अमोणकर, सुशीलाबाई पटेल, वामनराव देशपांडे, बबनराव हळदणकर, सुलभा पिशवीकर, कमल तांबे, शैला दातार, पद्मा तळवळकर, कौसल्या मंजेश्वर, सुहासिनी मुळगांवकर अशा अनेक शिष्यांचा समावेश होतो.

सुरेल आवाज, अविरत साधना आणि अखंड तपस्येमधून मोगूबाईंनी संगीत क्षेत्राच्या समृध्दतेत मोलाची भर घातली.

### हिराबाईच्या घरामधून मिळालेले सांगीतिक वातावरण

हिराबाई बडोदेकरांचा जन्म 29 मे 1905 मध्ये 'मिरज' येथे झाला. त्यांचे पाळण्यातील नांव चंपाकली ठेवण्यात आले होते. पण पुढे त्यांना त्यांच्या आजींच्या 'हिराबाई' नावाने हाक मारली जाऊ लागली. हिराबाईंना आई आणि वडिल अशा दोघांच्याकडून संगीताची परंपरा लाभल्यामुळे घरंदाज संगीताचे रक्त त्यांच्या अंगामध्ये जन्मापासूनच होते. हिराबाईंचे वडिल खॉसाहेब अब्दुलकरीम खॉ हे किराणा घराण्याचे प्रवर्तक होते. अब्दुल करीम खॉ जेव्हा बडोद्याचे दरबार गायक होते तेव्हा हिराबाईंची आजी म्हणजे मोठया हिराबाई बडोदयाच्या दरबारातील कलावान खात्यात अधिकारी म्हणून काम बघत होत्या. धाकटया हिराबाईंची आई ताराबाई ही मोठया हिराबाईची मुलगी होती. मोठया हिराबाईंनी आपली मुलगी ताराबाई हिला अब्दुल करीम खॉ यांच्याकडे गाणे शिकण्यास पाठविले. पुढे मोठया हिराबाई गेल्यावर ताराबाईंना बडोद्यातील दरबारामध्ये राहणे अशक्य झाले. अब्दुल करीम खॉ यांना देखील दरबारातील लोक त्रास देऊ लागले म्हणून अब्दुल करीम खॉ यांनी बडोदा सोडायचे ठरविले. ताराबाईंनी देखील अब्दुल करीम खॉ यांच्याबरोबर 1898 मध्ये बडोदा सोडले आणि ते मिरज येथे स्थायिक झाले. मिरजेला

अब्दुल करीम खॉ यांनी आर्य संगीत मंडळाची स्थापना केली. पुढे अब्दुल करीम खॉ यांनी ताराबाई बरोबर निकाह केला. निकाहानंतर ते मुंबई मध्ये स्थायिक झाले. ताराबाईंना सुरेशबाबू , चंपाकली उर्फ हिराबाई , कमलाबाई , कृष्णराव, सरस्वतीबाई अशी पाच मुले झाली. अब्दुल करीम खॉ व ताराबाईंनी वीस वर्षे एकत्र संसार केला. पण पुढे संसारातील कुरबुरी वाढू लागल्यामुळे 1918 मध्ये ताराबाईंचा अब्दुल करीम खॉ यांचेशी बेबनाव झाला म्हणून ताराबाईंनी मुंबईमध्ये पाच मुलांसह स्वतंत्र संसार थाटला.

### *हिराबाईंचा सांगितिक प्रवास*

हिराबाईंचे वडील अब्दुल करीम खॉ हे किराणा घराण्याचे ख्यातकीर्त गायक होत. असे असून देखील त्यांनी हिराबाईंना मात्र कधीच गाण्याची तालीम दिली नव्हती. कारण मुलींनी गाणे शिकणे कुलीन स्त्रियांचा रिवाज नसल्यामुळे हिराबाईंनी गाणे शिकणे त्यांना मान्य नव्हते. तसेच हिराबाईंची आई ताराबाईंना देखील आपल्या मुलींनी खुप शिकावे, डॉक्टर व्हावे आणि समाजामध्ये प्रतिष्ठितपणे जगावे असे वाटत होते. त्या काळात संगीत कला स्त्री शिकते म्हणजे ती प्रतिष्ठित नाही असेच मानले जात असे, त्यामुळे हिराबाईंकडे त्यादृष्टीने समाजाने बघू नये म्हणून हिराबाईंना गाणे शिकवण्यास त्यांच्या आई वडीलांचा सक्त विरोध होता. वास्तविक हिराबाईंचा आवाज लहानपणापासूनच सुरेख व गोड होता पण सामाजिक रुढींपुढे त्यांचे काही चालत नव्हते.

पुढे ताराबाईंचा अब्दुल करीम खॉ यांच्याशी बेबनाव झाला आणि हीच गोष्ट हिराबाई व त्यांच्या दोन बहिणींच्या पथ्यावर पडली. घरातली सर्व जबाबदारी एकटया ताराबाईवर येऊन पडली. आर्थिक अडचणींमुळे ताराबाईंनी हिराबाईंना गाणे शिकवण्याचा निर्णय घेतला. अब्दुल करीम खॉ यांनी सुरेशबाबूंना लहानपणापासूनच संगीताची कायदेशीर तालीम दिली होती. ताराबाई अब्दुल करीम खॉ यांच्या बरोबर राहत असतांना त्यांच्या घरामध्ये अखंड संगीताचा यज्ञ चालत असे. अनेक विद्यार्थी अब्दुल करीम खॉ व ताराबाईंकडे संगीत शिकण्यासाठी येत असत. त्यामुळे कळत नकळत संगीताचे संस्कार सर्वच मुलांवर झाले होते. हिराबाईंना प्रत्यक्ष समोर बसून जरी अब्दुल करीम खॉं यांनी शिकवले नसले, तरी त्यांच्या गाण्याचे संस्कार आपोआपच हिराबाईंच्या मनावर झालेले होते. हिराबाईंनी संगीताचे प्राथमिक शिक्षण त्यांचे थोरले बंधु सुरेशबाबु माने यांच्याकडून घेतले. पण बहीण भावामध्ये गुरु–शिष्याच्या नात्यातील समंजसपणा नसल्यामुळे ताराबाईंनी हिराबाईंना 1918 मध्ये किराणा घराण्याचे श्रेष्ठ गायक वहिद खॉ यांच्याकडे संगीताचे शिक्षण घेण्यासाठी पाठविले. वहिद खॉ यांनी हिराबाईकडून 1918 ते 1922 अशी चार वर्षे संगीताची कसून तालीम करुन घेतली. घरच्या आर्थिक हलाखीमुळे हिराबाईंना लहान वयातच संगीताचे जलसे करण्यासाठी बाहेर पडावे लागले. 1921 मध्ये हिराबाईची आई ताराबाईंनी नूतन संगीत विद्यालयाची स्थापना केली. त्या विद्यालयातील विद्यार्थ्यांना ताराबाई, हिराबाई व सुरेशबाबू संगीताची तालीम देत असत.

### *हिराबाईंचा परिवार*

1924 मध्ये हिराबाईंचा विवाह सोलापूर मधील धनीक श्री माणिकचंद गांधी यांच्या बरोबर झाला. 1928 मध्ये हिराबाईंना एक पुत्ररत्न झाले त्याचे नांव त्यांनी गुरुनाथ ठेवले. हिराबाईंनी विवाह केला तरी त्यांनी आपल्या आईची व चार भावंडाची जबाबदारी व्यवस्थित पार पाडली. 1946 मध्ये ताराबाईचे निधन झाले आणि 1953 मध्ये हिराबाईंचा मोठा भाऊ सुरेशबाबू यांचे निधन झाले. जो हिराबाईंना प्रत्येक कार्यक्रमात व रंगभूमीवर सतत सोबत करत असे. हिराबाईंनी कमलताई, सरस्वतीबाई, कृष्णराव आणि त्यांच्याबरोबर सुरेशबाबू यांच्या पत्नीचा व मुलांचा व्यवस्थित सांभाळ केला. त्यासाठी त्यांनी तंबोऱ्याची साथ मात्र कधीच सोडली नाही.

### *हिराबाईंचे सांगीतिक कार्य*

हिराबाईंनी 1921 मध्ये पंडित विष्णू दिगंबर पलुस्करांनी भरवलेल्या संगीत परिषदेमध्ये गाऊन संगीत क्षेत्रात पदार्पण केले आणि तिथून हिराबाईंनी 'स्त्री' कलाकार' म्हणून संगीत कला स्वरमंचावर आणण्यासाठी पहिले क्रांतिकारी पाऊल उचलले. 1924 साली हिराबाईंनी ऐतिहासिक विक्रम केला. त्यांनी तिकीट लावून आपल्या गाण्याचा जलसा केला. तोपर्यंत कोणी धनिक किंवा संस्था, कलावंताला सुपारी देत असे आणि कलावंत मिळालेल्या बिदागीमध्ये आपले गाणे सादर करीत असे अशी प्रथा होती. अब्दुल करीम खॉ यांनी ही प्रथा मागे टाकून तिकीटावर सार्वजनिक कार्यक्रम करण्याचा उपक्रम राबवला होता. पण एका स्त्रिने असा जाहीर कार्यक्रम करण्याचा पहिला विक्रम हिराबाईंनी केला. हा जलसा त्यांनी पुण्याच्या आर्यभूषण थिएटरमध्ये केला. स्त्रियांना उपजिविकेचे साधन मिळावे ह्या उद्देशाने त्यांनी हा जलसा घडवून आणला होता. हया जलशाचा आस्वाद घेण्यासाठी आलेल्या पुरुषांच्या लक्षात आले की स्त्रियांचा सांगितिक वनवास आता संपला. पुढे हिराबाईच्या प्रत्येक जलशाला ते आपल्या लेकी सुनांसह आवर्जून जाऊ लागले आणि संगीताचा आस्वाद घेण्याची संधी स्त्रियांना मिळू लागली माजघरामधील संगीत हिराबाईंच्या मुळे स्वरमंचावर आले. एक चांगले सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याचे कार्य हिराबाईंनी केले. त्या काळामध्ये स्त्रिया साथीदारांसह मंचाच्या मध्यभागी उभ्या राहून अदाकारी संगीत गात असत ती प्रथा प्रथम हिराबाईंनीच मोडून काढली. त्या मंचावर नऊवारी साडी , दोन्ही खांद्यावर पदर घट्ट लपेटलेला अशा येत असत. मंचावर आल्यावर नम्रपणे श्रोत्यांना नमस्कार करत असत. मंचाच्या मध्यभागी स्वतःच्या हातात तानपूरा घेऊन त्या बसत असत. त्यांच्या डाव्या हाताला सारंगी व हार्मोनियम वाजवणारे साथीदार तर उजव्या हाताला तबला वाजवणारा साथीदार बसत असे. हिराबाईंनी स्वरमंचावर शालीनतेने पर्दापण केले आणि तीच शिकवण त्यांनी समाजातील स्त्रियांना देखील घालून दिली. त्यांनी स्वतःचा पदर रंगमचावर कधी ढळू दिला नाही आणि तोच आदर्श त्यांनी कुलीन स्त्रियांसमोर ठेवला त्यामुळे त्या काळातील स्त्रिया निर्धास्तपणे स्वरमंचावर वावरु लागल्या. हिराबाईंनी आपल्या वर्तनातून संगीत कलेला सन्मान प्राप्त करुन दिला आणि कुलीन स्त्रियांसाठी संगीताचा राजरोज मार्ग निर्माण करुन दिला. संगीत कलेची राजदरबारातील अदाकारी पध्दती मागे टाकून संगीत कलेला स्वरमंचावर सन्मानाने बसवले. स्त्रिया मैफिलीमध्ये ख्यालगायन करु लागल्या आणि ख्याल ह्या शास्त्रीय संगीतातील मुख्य प्रकारांबरोबर ठुमरी, होरी, चैती, भजन इत्यादी गीतप्रकार गाऊ लागल्या. ही प्रगती हिराबाईंमुळेच समाजातील स्त्रियांना साधता आली. हिराबाई 1928 मध्ये प्रथमच मुंबई आकाशवाणी केंद्रावर गायल्या आणि त्यांनी संगीत कला महाराष्ट्रातील घराघरात पोहोचवली. त्यानंतर त्यांनी दिल्ली, कलकत्ता, लखनौ इत्यादी अनेक आकाशवाणी केंद्रावर संगीताचे कार्यक्रम देऊन शास्त्रीय व सुगम संगीत भारताच्या कानाकोप–यात पोहोचवले. पंजाबमधील हरीवल्लभ संगीत महोत्सवात पहिली स्त्री गायिका म्हणून गाण्याचा मान हिराबाईंनी पटकावला व त्यानंतर अनेक नामवंत स्त्री कलाकार हरीवल्लभ समारंभात आपले गायन सादर करण्यासाठी जाऊ लागल्या. रस्त्यावरील गणेशोत्सवामध्ये एक हजार लोकांसमोर ध्वनिक्षेपक नसतांना

गाण्यांचे सादरीकरण करण्याचे धाडस सुरुवातीला हिराबाईंनी केले होते. त्यानंतर त्यांचे अनुकरण मग अनेक स्त्री कलाकार करु लागल्या होत्या स्त्री कलाकारांना स्वतःचा चरितार्थ स्वतःला सन्मानाने करता यावा ह्यासाठी हिराबाईंनी स्त्रीयांचे घराणे जन्माला घातले. त्या काळामध्ये संगीत रंगभूमीवर स्त्रियांच्या भूमिका स्त्रियांनीच कराव्यात ह्यासाठी स्वतः पहिले पाऊल उचलले आणि संगीत नाटकामधून स्वतः भूमिका केल्या. स्त्रियांना संगीत रंगभूमीच्या माध्यमातून आणखी एक उपजिविकेचा मार्ग उपलब्ध करुन दिला. स्वतःची नूतन संगीत नाट्य संस्था काढली. त्यामध्ये त्यांनी अनेक पुरुष कलाकारांना कामाला लावले आणि त्यांच्या कुटुंबाला त्यांनी आर्थिक हातभार लावला. चालू काळाची संगीताची अभिरुची लक्षात घेऊन मैफिलीमध्ये ख्यालाबरोबर ठुमरी, झुला, होरी, टप्पा, भजन, नाटयगीते इत्यादी प्रकार गाऊन सामान्य रसिक श्रोत्यांच्या मनात संगीताची गोडी निर्माण केली. स्त्रियांना संगीताच्या मैफिली ऐकायला जातांना संकोच वाटू नये म्हणून आदर्शवादी वातावरणाची निर्मिती हिराबाईंनी स्वतःच्या मैफिलीमध्ये केली व एक चांगला पायंडा मैफिलीच्या स्वरुपामध्ये पाडला. त्यांनी स्वतःच्या मैफिलीमध्ये कधी थिल्लरपणा येऊ दिला नाही व समाजासमोर तसाच आदर्श ठेवला. हिराबाईंनी दासबोधातील ओव्यांना चाली लावूल भक्तीमार्गाची गोडी देखील स्त्रियांमध्ये वाढविली.

### *हिराबाईचा शिष्य परिवार*

हिराबाईंनी विद्यादानामध्ये देखील भरघोस कार्य केले. डॉ. प्रभा अत्रे, माणिक वर्मा, सरस्वती राणे, जानकी अयर, मालती पांडे, बकूळ पंडीत, सुहासिनी मुळगांवकर, सुलभा ठकार, शैला आपटे, मीरा परांजपे इत्यादींचा त्यांच्या शिष्यगणात समावेश होता. पुढील पिढीला त्यांच्या संगीताचा वारसा जपता यावा म्हणून हिराबाईंनी नाट्यगीते. ठुमऱ्या, भजन, सुगमगीते इत्यादींच्या मिळून सुमारे पावणेदोनशे ध्वनीमुद्रिका काढल्या.

संगीत नाटक ॲकॅडमी गौरव, सूरयोगिनी गौरव, शारंगदेव फेलोशिप, बालगंधर्व सुवर्णपदक, विष्णुदास भावे गौरव पदक मराठी साहित्य संघातर्फे विशेष गौरव आणि इंडियन टोबॅको कंपनीचा किराणा गायकी शिकण्याचा विशेष पुरस्कार अशा अनेक पुरस्कारांनी त्यांना सन्मानित केले गेले. 'उपवनी गात कोकिळा', 'वद जाऊ कुणाला शरण ग' 'हुतो तोरे कारण', मधुमधुरा तव' 'राधेकृष्ण बोल मुखसे' होरी खेलो मोसे नंदलाला ह्या पदांनी त्या काळातील रसिक श्रोत्यांची मने झुलवत ठेवली.

हिराबाईंनी आपल्या नेतृत्वातून, कर्तृत्वातून आणि व्यवसायातून संगीत संस्कृतीत मोलाची भर घातली आणि आपल्या सांगीतिक चळवळीतून एक वेगळीच क्रांती भारतीय संगीतात घडवून आणली.

### *निष्कर्ष :*

मोगूबाईची वाट एकाकी होती. घरातून कोणतेच सांगीतिक संस्कार त्यांच्यावर झाले नसल्यामुळे संगीत कला समाजाभिमुख करण्यासाठी त्या थोडया अलिप्त राहिल्या. मोगुबाईंनी स्वतःची वाट स्वतः शोधून प्रथम स्वतःला घडविले. संगीताची तालीम मिळविणे हयाच गोष्टीला मोगूबाईंनी प्राधान्य दिल्यामुळे आपली कला आपल्या भोवतीच केंद्रीत केली असे मला वाटते. स्वतःला गुरु मिळवतांना करावी लागणारी धडपड इतरांना करावी लागू नये म्हणून विद्यादानाच्या कार्यावर मात्र त्यांनी जास्तीत जास्त भर दिला आणि वाग्गेयकार बनून अनेक रागात चीजा रचण्याचे कार्य मोगूबाईंनी केले.

सांगीतिक कार्य करण्यासाठी लागणारे संस्कार हिराबाईच्या मनावर बालपणापासूनच घरातून ठसलेले होते. त्यांचे वडिल अब्दुल करिम खॉ यांनी संगीत प्रसारासाठी आर्य संगीत समाजाची स्थापना केली. तिकीट लावून जलसे केले ते संस्कार हिराबाईच्या मनावर निश्चितच झाले होते. परिवाराचा भक्कम पाठिंबा असल्यामुळे त्यांनी स्वतःला संगीतात झोकून देऊन संगीतासाठी कार्य केले. आज मुली सहज संगीताचे शिक्षण घेत आहेत. मंचावर बसून सहज गाऊ शकत आहेत त्याचे सगळे श्रेय हिराबाईंना आहे कारण हिराबाईंनी माजघरातील संगीत मंचावर आणल्यामुळे स्त्रियांना संगीताचे दालन उपलब्ध झाले. हिराबाईंनी जर ही हिंमत त्या काळात दाखविली नसती तर स्त्रियांचे गाणे निश्चितच चार भिंतीच्या आतच राहिले असते. हिराबाईंनी मोठी काटेरी वाट पार करुन संगीत कलेला, सुरांना समाजात प्रतिष्ठा मिळवून दिली. चालू काळाशी जमवून घेत हिराबाईंनी श्रोत्यांची आवड लक्षात घेवून सामाजिक बदल घडवून आणून संगीतात मोठी क्रांती केली आणि आपल्या संगीतातून सामाजिक कार्यात भर घातली.

अर्थात दोघी अत्यंत महान गायिका होत्या. त्यामुळे त्यांच्या कार्याची तुलना करणे अयोग्य आहे. फक्त परिस्थितीमुळे त्यांच्या कार्यात वैविध्यता निर्माण झाल्याचे दिसून येते.

### *संदर्भ :*

1) प्रा. कल्याणी किशोर, गानतपस्विनी, के ॲण्ड के पब्लिकेशन, नाशिक 1986, द्वितीय आवृत्ती.
2) शैलजा पंडित / अरुण हळवे, गानहिरा, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई 1985 प्रथम आवृत्ती
3) डॉ. नारायण मंगरुळकर, संगीतातील घराणी आणि चरित्र, स्वरसंपदा प्रकाशन, नागपूर 1992 , प्रथम आवृत्ती
4) ए.पी. नारायणगांवकर , स्वरयोगिनी, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई 2001 प्रथम आवृत्ती
5) दत्ता मारुलकर, गानसरस्वती, राजहंस प्रकाशन पुणे 2006 प्रथम आवृत्ती
6) पु.ल. देशपांडे संगीताच्या अंगणातील तुळस, स्वरसेतू, श्रीराम कल्चरल ट्रस्ट
मुंबई अंक 3 रा
7) श्री माधव पंडीत, गानतपस्विनी मोगुबाई कुर्डीकर संगीत कला विहार, अ.भा. गांधर्व महाविद्यालय मंडळ, मिरज एप्रिल 2001 , अंक 4
8) वा.ह.देशपांडे, आलापिनी, मौज प्रकाशन, मुंबई 1979, प्रथम आवृत्ती

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.org